. सं. ठाणें
काव्य
२७७
१९३२

# गीतगुंफा

यशवंत नरसिंह केळकर

REFBK-0004727
REFBK-0004727

१९३२

# गीतगुंफा

६६३०

यशवंत नरसिंह केळकर

१९३२

वाणी ममैव सरसा यदि रंजयित्री ।
न प्रार्थये रसविदां अवधानदानम् ॥

कवीची वाणी सरस असेल तर रसिकांना अवधान देण्याविषयीं विनंति करण्याचें कारण नाहीं; म्हणजेच उलट ती तशी नसेल तर विनंति करूनहि कांहीं उपयोग होणार नाहीं हें उघड आहे.

प्रस्तुत पुस्तक हा केवळ हौसेचा मामला आहे. या छोट्या संग्रहांत माझ्या आजतागायत बहुतेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध कवनांचा संग्रह केला आहे. गीतद्विदलानंतर कांहीं कविता रत्नाकर, यशवंत, मनोरंजन, केसरी, वैनतेय वगैरेंत आल्या होत्या. त्याहि यांत समाविष्ट केल्या आहेत.

पुस्तक सुबक छापण्याचे कामीं 'समर्थ भारत' छापखान्याच्या चालकांनीं बरीच काळजी वाहिली.

जिच्या कविता पाहून मी लहानपणीं कविता करावयास शिकलों त्या माझ्या ज्येष्ठ भगिनीस हा संग्रह अर्पण करतों.

# अनुक्रम

सं.क्रमांक १०४२
३०/५/३

१ सुखाचें माहेर ... १
२ सायंतारा ... ... २
३ तापल्या माळावरचें रानफूल ... ... ३
४ ‘ महारदऱ्या ’वरील सायंकाळ ... ५
५ काळोखाच्या मखाखालती फुलुनी बहरा अला मोगरा ... ... ६
६ वक्रविधुकोर हीं ... ९
७ पतंग ... ... १०
८ झोंप कशी आली: ... ११
९ चतूर ... ... १२
१० गोविंदा निशा जुरली १३
११ बागेंतील सकाळ ... १४
१२ चांदणी पहांट ... १६
१३ आमचा पिंपळ ... १७
१४ येवढीच तुजला भाक १८
१५ श्रवणिं कां न ये बांसरी १९
१६ पाऊस ... ... २१
१७ मुसळधार पाऊस ... २३
१८ पहांटच्या पावसांतील गवळ्याचा पोर ... २४
१९ एका चुकलेल्या पांखरास २७
२० बंदिवान हरिण ... २९
२१ परी न आला गवळी अजुनी ... ... ३०
२२ हीं तों जनावरें प्रेमाचीं माहेरें ... ... ३२
२३ ‘ हरिणी ’ आणि ‘ चमेली ’ ... ३७
२४ घातला फांसा तव जीविता ... ... ३९
२५ माझा आवडता ससा ४२
२६ पोरी ... ... ४४
२७ सिंधूस ... ... ४६
२८ मी मनांत बाला झालें ४७
२९ एक दृश्य ... ... ५०
३० चुंबुनी झांकूं दे तारि मला ... ... ५१
३१ गर्द ढगावर ... ५२
३२ गोड आठवण ... ५३
३३ दुःसह स्मृति ... ५४
३४ उमलुनि वांया जाउं नको ... ... ५६
३५ गति दोल्याची ... ५८

३६ गायिका ... ... ५९
३७ केशभूषा ... ... ६१
३८ माझा जाईचा वेल ... ६३
३९ मेलेली जाई ... ६६
४० काढिसी करुण पूर्णशा
वचा ... ... ७०
४१ अर्धोन्मीलित ... ७२
४२ काय माझी लाज ... ७३
४३ निराशा ... ... ७५
४४ यदृच्छेस ... ... ७७
४५ बालमित्र ... ... ७८
४६ मृत्यु कसा हवा? ... ७९
४७ वात्सल्यातिशयें ... ८०
४८ नकोत खर दूषणें ... ८१
४९ विश्वकर्म्याची मोट ... ८२
५० मध्यरात्र ... ... ८४
५१ गोटा घोटिव ... ८५
५२ हिंदुदुर्गाचा पोवाडा ८७
५३ चिलिया ... ... ९२
५४ तूं खराच, काळा !
काळा ... ... ९३
५५ —ना ... ... ९५
५६ बालगंधर्वास ... ९६
५७ संतत जाणीव ... ९७
५८ तेंच गडे गाई गाणें ९८
५९ जाळावया पोट ... ९९
६० उन्हाळ्यांतलि पिंपळ १०१
६१ दोल्यावरी बसोनी जीं
गाइलीस गाणीं ...१०३

# गीतगुंफा

REFBK-0004727

REFBK-0004727

संग्रह २०४४ २०१७/३२

# सुखाचें माहेर

दूर जगाहुनि दूर जनाहुनि दूर उपाधींपासून
सौख्य राहिलें दूर निसर्गीं शोधा तेथें जाऊन ॥
लतासुमांची हलतीडुलती हंसरी सृष्टी निर्मियली
हृदयरागरागिणी गाउनी विहग-गणांनीं बोलविली ॥
वाऱ्याचें अलगूज ऐकतां लतानिकुंजीं सुमनांची
कळी खुलोनी सुधा पाझरे उचंबळोनी हृदयींची ॥
वाऱ्याच्या झोल्यावर झोंके घेत हांसती तीं सुमनें
लता लोटिती लांबवूनि कर कोमल अपुले प्रेमानें ॥
मधुर मंजिरी कर्णीं खोवुनि रसालशाखा पालवत्या
रसालफल–कंदुकासवें बहु तोषित होती कशा न त्या ?
वाऱ्यावरतीं फेऱ्या घालित फिरणाऱ्या त्या विहगतती
शिवाशिवी पाहण्यास त्यांची पाण्यावर लाटा उठती ॥
हिरव्या हिरव्या हिरवळ कुरणीं चरत्या देखा गाइगुजी
गोपगुराखी कशास व्हावें कळेल तेव्हां तुम्हांस जी ॥
पाषाणाच्या पर्वतांतही प्रेम दाटतें येथ किती ।
हृद्‌गंगा वोळल्या तयांच्या पहा तयांना नसे मिती ॥
आनंदाची प्रभात फुलते निसर्ग-लक्ष्मीच्या जगतीं ।
तन्मय होती 'द्विज' जे जगतीं 'निर्माण' कवी ते ठरती ॥

८८२५

## सायंतारा

समोरच्या कौलारावरुनी
ठळक चांदणी टंवकारोनी
चकित लोचनें लक्षित कोणी
स्थिर तेजाच्या स्निग्ध शरांनीं विकच करी नेत्रांस ॥

२

विशाल व्योमीं विविक्त तारा
तेजाच्या पसरुनि विष्टरा
जणों महाश्वेता ही अपरा
करुणालापा आळआळवुनि विद्ध करी हृदयास ॥

विष्टर—आसन.

## तापल्या माळावरचें रानफूल

गेला तापुनि सारखा धगधगे पायीं तुझ्या माळ हा
सूर्याची झळई वरोनि झळके तेजाळ ही दुःसहा
काळ्याभोर भकास भोंवति उभ्या या तापल्या टेकड्या
वाऱ्याचे विषदिग्ध उष्ण जहरी फूत्कार फेकावया.

२

खालीं रुक्ष अफाट माळ, वरतीं अस्मान तें आयत–
भासे भोर निळें. परी मृगजळीं उष्माच वाढे नित.
नाहीं वृक्ष, तशीं विशीर्ण झुडुपें तींही न येथें उभीं
पक्ष्यांची पळती न एकहि दिसे छाया इथें भूवरी.

३

वाऱ्याच्या लहरी झपाटुनि जधीं जातात ऊर्जस्वला
भासे कीं कढता उमाळ उठती आवेग तेजोजला
कोठें भुर्भुरतीं उगाच भुरटीं तीं वन्य जीर्ण तृणें
प्रेताच्या शिरिंच्या उदास हलत्या केसांपरी तें गमे.

उमाळ–असंख्य दास–गुलाम.

४

तेजाच्या असल्या मुशींत कुसुमा उल्हासुनी हासशी
देते कांचनभूषणास उजळा अंगारराशी जशी
प्रकृत्याच परी कठोरतर तें कोठें बरें कांचन
कोठें हें जखमी नखें सहजची होणार म्लानानन ?

५

पायीं फत्तर तापले रचियले देहा चिणाया तुझ्या
वाऱ्याच्या जळत्या जिभा सभंवत्या या सारख्या चेतल्या
ओलावा नुरला सुरेख हिरवा हा देहही शोषला
हास्याचा बरवा विलास तरिही कैसा तुला मानला ?

६

हास्यावांचुनि वाळलें मुख, तशीं गात्रें विसाव्याविना
प्राणांचे जड श्वास टाकित पडे भूमीवरी दास ना ?
त्याच्या खिन्न मनीं सदा विकसल्या त्या रम्य स्वप्नापरी
एकाकी मधुराकृती तव फुला ! या दग्ध माळावरी.

## ‘ महारद्र्या ’वरील सायंकाळ

केव्हां पाण्यावरुनि तरतां पांढरी स्वच्छ छाया।
वाटे गोषा निरसुनि वरी येत देवी फिराया ।
वायूसंगें सित पदर कीं दूर पाहे सराया।
लाटा मोठ्या रुळत कुरळ्या केशपाशापरी या ॥
छोटे पक्षी विखरुनि यदा पांढऱ्याशा परांना ।
ठायीं ठायीं सलिललहरी चुंबुनी पांगतांना।
चंचूनीं त्या सलिलवसना पाहती ओढण्याला।
वीचींच्या या मृदुल पडती तैं चुण्या पालवाला ॥

महारदरा—साताराचा सुंदर तलाव. देवी—जलदेवी.

# काळोखाच्या मखाखालतीं फुलुनी बहरा अला मोगरा

काळोखाचें हें कळसूत्री
द्वार सरकतें क्षितिजांमधुनी
व्योमांगणिं तारका जमोनी
अगणित बघती चकित लोचनीं
परी खालतीं ही जड अवनी
गर्द तमीं या गेली गढुनी
धडपडते, परि समीरलहरी
काळोखाला उचंबळोनी
गुदमरुनी टाकितात तिजला.

२

अथांग सागरतळांत दुसरी
वरुणाची वनराइच नटली
वृक्षवल्लरी पक्षांवांचुन
हालचाल ती शब्दावांचुन
जड तें सगळें विरुनी गेलें
दिव्य तेवढें उदया आलें
काळोखाच्या मखाखालतीं
फुलुनी बहरा अला मोगरा

३

काळोखाचे विशाळ कातळ
उभे ठाकले भोंवति निश्चळ
वाऱ्याचे पाझरती ओझर
एकांताचे निगूढ कंदर
पर्णपुटांचा उटज एकला
त्यांत एकली जड जगताला—
विन्मुख रमसी तापस-बाला
निश्वासांनीं नुसत्या अपुल्या
प्रदेश करिसी तुझा अंकिला

४

सुप्त बालका कुशीस घेउनि
तशीच निजली वा जी रजनी
अपरात्रीं परि नीज निवोनी
सहज सुखाची जागृति येउनि
काळोखांतहि उघडुनि डोळे
स्वानंदाशीं अपुल्या खेळे
कालिकांच्या मृदु मुष्टी वळुनी
हर्षानें जणुं गेलें ढवळुनि

५

नक्षत्रांच्या गळल्या स्वाती
तमोदधीच्या तळांत मोतीं—
पुष्पें अगणित फुलुनी जाती,
पाणिदार तव विशेष जाती
पल्लवपुटशुक्तिकेंत शोभसि
म्हणुनि मोतिया तुजला म्हणती.

## वक्रविधुकोर ही—

[ चालः—‘आज नंदलाल०’ अगर ‘होय संसारतरु०’ ]

वक्रविधुकोर ही शाममंडलयुता
उपजवी कौतुका चित्तहर चारुता ।। धृ० ।।

१

गगनगंगेहुनी । पयकलश कीं भरुनि ।
चालली परतुनी । बालवनिता अतां ।। वक्र० ।।

२

स्थूल घट स्थापिला । चिमुकल्या कटितला ।
शुभ्र कर वेष्ठिला । कलशकंठा अतां ।। वक्र०

# पतंग

अस्मानावर कोण बागडे–
कवडाशापरि इकडे तिकडे
खालींवरतीं मधेंच मुरडे
मधेंच हा स्थिर भुरका चंदिर पुनवेच्या अंत्यातपांत कीं?
या अंगावर त्या अंगावर
कलतो डुलतो मधेंच सुंदर
गिरके खाउनि मुहूर्त हा स्थिर
फूलपांखरूं मिटुनी चिमणीं पक्षपुटें जैं स्थिर पर्णावर॥

६६३०
संख्या १०४२
३०/५/३२

## झोंप कशी आली

हिमवर्षावापरी टिपुर चांदणें अंगणीं खुले
भुले मन भुरक्या मोहामुळें
शातीच्या रसरंग भरती भरली; भासुर स्फुरे
चांदणें-फेसच वरती उले
उदासमानस खिन्नगात्र मी तेथ जसा पहुडलों
क्षणांतचि मोहाकुल जाहलों
जड नयनांवरतीं झांपड लागे पडूं
निद्रेचें मग तें गोड रातपांखरूं
पक्ष्मांची पांखें पसरुनि लागे उडूं
क्षणांत उडुनी उंच उडालें स्वप्नाच्या अंबरीं
तेथली वर्णुं काय माधुरी? ॥

## चतूर

प्रखर हें ऊन भवतालीं । खरखरतें करितें होळी
गुंफात गाढ या वेळीं । मृदु हरित पालवाखालीं
नयनांवर झांपड पडुनी । पेंगलीं फुलें हीं इथलीं
निद्रिस्त फुलांचा श्वास
श्वास तूं तसा निःश्वास
मूर्तिमंत मज गमतोस
चुंबुनी दूर त्यां जासी चुंबाया पुनरपि येशी ॥

# गोविंदा निशा नुरली

[ भैरवी ]

गोविंदा निशा नुरली
मुरलीनें प्राशिली ॥
शाम घटावर श्वेत दह्याची॥
लाहि फुटावी तशी उषा—
पसरलि ही निशा सरली
मुरलीनें प्राशिली ॥

२

काळी कपिला गहन त्रियामा
करधारांनीं पान्हवली
पसरलि ही निशा सरली
मुरलीनें प्राशिली ॥

# बागेंतील सकाळ

कवडाशापरि फिरति फुलांवर चंचल फुलपांखरें
चुकवाया त्या पुष्पमुखांची धांदल कितितरि उडे ॥
लाल गर्द झेंडूचे गेले वहरुनिया ताटवे
उषःकाळचा अरुण येउनी स्थिर झालासे गमे ॥
वीणारवें अनुरणत अखंडित सप्तस्वरवाटिका
उग्रमधुर शेवंतसुवासीं इतर फुलांच्या छटा ॥
ठायिं ठायिं कोळ्यांचीं जाळीं गवतांवर पसरलीं
लिलीपुटीयन सैन्यानें जणुं छावणीच घातली ॥
तलम किरमिजी अभ्रकपंखें चतूर वल्हवित फिरे
हवेस टांके घातल्यापरी सुमासमिप वावरे ॥
लालपीत झेंडूंच्या अगणित पायदळीं पाकळ्या
आर्द्र मातिवर शोभतात, जणुं हळदकुंकु रांगुळ्या ॥
विशाळ आळवपत्रीं दाटुनि सुढाळ दंवकण किती
वाऱ्यानें डळमळतां पानें पाऱ्यापरि खेळती ॥
स्निग्धमधुर गंभीर गुंजतां मंथर भ्रमर भ्रमे
मालतिच्या मांडवांत नादब्रह्म दिसे जागलें ॥
केळींच्या कण्यांत ओघळुन तळास जळ सांचलें
पांचूच्या प्यालयांत हिमाचा तुकडा कीं विरघळे ! ॥

कुठें खेटुनी दाट कर्दळी-कुळें दिसत माजलीं
लाल गुलाली अंकुशाकृती फुलें वरी साजलीं ॥
हिमपुंजाचा फेल पडोनी प्रफुल्ल दरिदरकुटें
शुभ्र फुलांच्या तेजीं थिजल्या तगरी तेवीं कुठें ॥
डोंगर-कठडीवर चरतांना दुरुनि शुभ्र वासरें
शोभिवंत वर खालीं दिसती, तइं साइलिचीं फुलें॥

## चांदणी पहांट

मंद मंद तारा । चिमोलीं साइलिचीं कुसमें
गुलाबची पिवळा । सुधाकर पांडुर त्यांत गमे
अभिनव न्हालेलीं । पटावर आर्द्र अंबराच्या
दंहिवर पाझरतां । भिजविल्या भूमी जगताच्या
वा आकाशाचा । मखमली विशाल शामियना
भव्य किती भासे । तारका मंद तेवतांना ।
व्याध विधू भासे । भासती वा हरिणी तारा
क्षितिजाचलशिखरीं । पातला वर्षित शर-निकरा
मुहूर्त स्थिर होती । पाहती मुरडित जणुं माना
स्वभावसुलभ परी । असे तें हरिणकदंबांना

## आमचा पिंपळ

पाताळांत मुळें सखोल घुसलीं भेदूनिया भूमिला
आभाळांत शिरें शिरोनि उचली शेषापरी अंबरा
मध्यें भव्य विशाळ भूतळिं उभा त्वद्देह हा पिंपळा !
आणी लाज उभ्याउभ्याच गमतें त्रैलोक्यव्यापी मुला !

त्रैलोक्यव्यापी मुला—वामनास.

## येवढीच तुजला भाक !

पल्लवात किसलय झालों
    कुसुमांत सुकोरक बनलों । चिमुकला ।
हरिणांत पोत नव चपल
    मी शकुंतशावक लोल । जाहलों ।
स्रोतांत स्रोतजलकणिका
  अति तलम तरल नव झुळका । वायुची ।
  तूं पिता । निसर्गा अतां ।
  सदय तत्त्वतां । वत्सला माता । वत्सला माता ।
फिरवी मज धरुनी हातां । यापुढें ॥

२

तोडिले बंध जगताचे
    वाचे ! न पुन्हा घे त्याचें । नांवही ।
दरकुटी जीर्ण पर्णकुटी
    दिव्य तो वास मजसाठीं । यापुढें ।
चांदणें शुभ्र वा तिमिर
  जें असेल तें मज चीर । यापुढें ।
  परि ध्यास । एक जीवास ।
  वास वनवास । असावा एक । असावा एक ।
येवढीच तुजला भाक । ईश्वरा ॥

# श्रवणिं कां न ये बांसरी

तीन सांजा टळुनि गेली । श्रवणिं कां न ये बांसरी ॥
॥ हरी रे ॥
दिवस संध्यामिषें वाळा । देखण्या तुला थबकला ॥
॥ हरी रे ॥
ओढ धरिली बांसरांनीं । कां न ती तुला बांसरा !॥
॥ हरी रे ॥
ओढित ओढी । जीवा तोडी
वृत्ति बसल्या रे तुजवरी । श्रवणिं कां न ये बांसरी ॥

२

दिवस सगळा खेळचाळा । कां न तो तुला पुरवला ॥
॥ अजुनि रे ॥
खेळ माझा मांडलासी । अवखळा ! कसा असा छळसी ॥
॥ हरी रे ॥
चांदवाही घरा परते । ये घरा तुला सांगतें ॥
॥ पोरट्या ॥
वेळा का ही । खेळायाची ? ॥
जीव जगला रे तुजवरी । श्रवणिं कां न ये बांसरी ॥

३

पांखरांचा चिंवचिंवाटा । लोपला मघां कोटरीं ॥

॥ पांखरीं ॥

चांदण्याच्या चादरीं त्या । चांदण्या सुखें झोंपल्या ॥

॥ कधिंच रे ॥

मेघ काळा कांबळा हा । चंद्र वर करें ओढितो ॥

॥ झोंपण्या ॥

पयधाराही । या तव विरहीं

कुरकुरति. ये लवकर घरीं । श्रवणिं कां न ये बांसरी ॥

॥ हरी रे ॥

पांखरीं–पंखाच्या पांखराखालीं.

# पाऊस

वृक्ष, वल्लरी विकल जाहले
विहगविरुत नीडांत निमालें
विपक्ष होउनि, भाते तुटले
वाऱ्याचे. जग मुकेंच पडलें।
तुझी एकसारखी चालली झिम झिम झिम झिम झिम

२

उदास अंबर, धूसर अंतर
अधरधरा धाराहत कातर
उच्च शैलशिर, नीच नदीरय
वस्तुजात विरघळुनि बोळले।
काय तुझी ही झिम झिम झिम झिम

३

धरणीवरतीं विटपें उठलीं
विटपांवरतीं पानें फुटलीं
पानांवरतीं फुलें उमललीं
रुचिर मुकुट मातींत पाडुनी
रडसी वरती झिम झिम झिम झिम

नदीरय–नदीचा प्रवाह.

४

आकाशावर हंड्या चढल्या
मेघांच्या तटतटोनि तुटल्या
जलकणिका–लाह्याच उसळल्या
बरसात खरी आनंदाची
गोपगणाची झिम झिम झिम झिम

५

कड्याकड्यातुन उड्या टाकिती
धडाधड किती नवस्रोततति
करांत कर घालुनी संगतीं
लपावयाला घळीघळींतुन
खळखळ करिती–झिम झिम झिम झिम

६

आसपासच्या वडावडांतिल
गाइगुर्जींचे कदंब निश्चल—
मूर्त प्रीत कीं दयार्द्रतेंतिल
नेत्र मिटोनी कर्ण उभवुनी
तन्मय; ऐकत झिम झिम झिम झिम

# मुसळधार पाऊस

तेजाळ विजेची सुरी
कचाकच घाव घालितां उरीं
उरीं फुटोनी हंबरताती दीन मेघ अंबरीं ॥

२

राहिला भरोनी घोर घनांचा वरी
घनघोर कोसळे पाउस सरिवर सरी
भिरभिरा भोंवरे घेत वात भींतरीं
काळोखाचा चिखल जाहला पाउस कसला तरी ?

३

विचकुनी भयानक दाढा त्या वरिवरी
चकचकाट–लचके वीज काढिते वरी
गडगडोनि अंबर गर्द चाललें वरी
कहरधार ही थडथड नाचे संतत छातीवरी ॥

४

जाहला पिंजरा जगताचा केवळ
टांगलें विजेच्या सळीस त्याचें दळ
भोवंडे देई भीम-वात-मंडळ
क्षणा-क्षणाला तुटेल वाटे कडकडतां वर नभ ॥

# पहांटच्या पावसांतील गवळ्याचा पोर

नभास देउनि दगा ढगांनीं दुंदुभ दुमदुम दुमदुमिलें
कातर ताराराण्यांचें त्या क्षणींच पाणी हो झालें ।।

२

पर्जन्यानें भिजुनी वारे तुषार विखरित भुरभुरती
निरुद्ध कंठीं अस्फुट शब्दीं ओष्ठ तयांचे पुटपुटती ? ।।

३

ओली ओली चिंब जाहली सगळी हिरवीचार धरा
पल्लवांवरी डाव मांडिती शिवाशिवीचा जलधारा ।।

४

पायदळीं पाडिलीं द्रुमांनीं पिकलीं पानें तीं भिजुनी
कुंद गंध राहिला तरंगत मुंद अंतरालामधुनी ॥

५

स्वकरसहस्रीं लपवी भास्कर अनंत व्योमांतिल मुक्ता
झेप घालुनी हिसकाया त्या, स्पर्धा ज्यांची किति म्हणतां ? ।।

६

विहंग वेजित, वेज वर्षतां पर्जन्यमिषें, तेच स्वतां
विन्मुख सन्मंगलाभिषेका सन्मुख निलया होत अतां ।।

७

प्रेमळ माता लता, सुमांना पर्णलपदरीं झांकविती
परी पदर सारुनी हळुच तीं सुमुखें अपुलीं भिजवीतीं ॥

८

वामस्कंधीं कावड चढली मान मुरडिली डाविकडे
पुढयांत लावुनि दृष्टी दुडक्या चालीं चालत गोप पुढें ॥

९

थुइ थुइ थुइ थुइ नाच नाचतें शुभ्र दुग्ध त्या चरव्यांत
क्वचित् कुठें उसळुनी थेंब वर, सर बाहेरीं ओसरत ॥

१०

पाउलवाटीं गवतें लवलीं, लवलीं त्यांवर रानफुलें
रानफुलांचा फेस दुभंगित जाशी तूं मोठया डौलें ॥

११

हंस पोहतां जशी मागुती क्षणैक जलपदवी स्पष्ट
पाउलवाटा दिसुनी होती क्षणैक तुजमागुनि नष्ट ॥

१२

मधुर सूर चालतो एकला एकतारिवर एकसरें
पाउलवाटीं त्याच चालसी त्याच गतीनें प्रतिदिनिं रे ॥

१३

निर्मळ प्रेमळ परममंगला ! पुण्यवास तव वनवास
पतित पापमय हत जगतानें कसा लाविला तुज फांस ? ॥

१४

गिरिशिखरांवर वास असावा निर्मळ सलिलस्रोतांचा
त्या अनघांनीं कसा चुरावा चरण पापमय नगरांचा ? ॥

१५

निसर्गांत त्या निष्पापा ! कां जगास येशी भेटाया
तेजस्तारा तुटोनि येतां शिळा बने त्याची काया ॥

१६

पापी विश्वाच्या सहवासें चंद्राहि क्षय लागतसे
पटुप्रसर तो कलंक ग्रासुनि पक्षावधिं त्या टाकितसे ॥

१७

गुलाम केलें पापें पुण्या, जड जगतानें निसर्गता
निसर्गपुष्पा ! तुजला आम्हीं दिधली निष्ठुर परवशता ॥

१८

किती वाटतें बंध तोडुनी येथिल तुजमागें जावें
डोंगरपाठीं ओढयाकांठीं गाइगुरांतुन विचरावें ॥

# एका चुकलेल्या पांखरास

[ चालः—श्रीमंत पतीची राणी० ]

भिरभिरा वरीं फिरताती
चिंवचिंवाट कलकल करिती
डाहळ्या धरुनि चरणांत
दोल्यावर डोले घेती
बोलवीत जगता बसती
परि तुला न कोणि बहाती
  पसरला पसारा वरतीं
  फुकटची गोड ओरडती
  कोणी न हांक तुज देती
एकेकापुरती प्रीती
एकेकाची या जगतीं ॥

२

एकही फळावर चोंच
रोंखिली न पोरा ! पुरती
निश्वास-श्वासमात्रानें
थरकती पिसें तव नवतीं

१३

निर्मळ प्रेमळ परममंगला ! पुण्यवास तव वनवास
पतित पापमय हत जगतानें कसा लाविला तुज फांस ? ॥

१४

गिरिशिखरांवर वास असावा निर्मळ सलिलस्रोतांचा
त्या अनघांनीं कसा चुरावा चरण पापमय नगरांचा ? ॥

१५

निसर्गांतल्या निष्पापा ! कां जगास येशी भेटाया
तेजस्तारा तुटोनि येतां शिळा बने त्याची काया ॥

१६

पापी विश्वाच्या सहवासें चंद्राहि क्षय लागतसे
पटुप्रसर तो कलंक ग्रासुनि पक्षावधिं त्या टाकितसे ॥

१७

गुलाम केलें पापें पुण्या, जड जगतानें निसर्गता
निसर्गपुष्पा ! तुजला आम्हीं दिधली निष्ठुर परवशता ॥

१८

किती वाटतें बंध तोडुनी येथिल तुजमागें जावें
डोंगरपाठीं ओढयाकांठीं गाइगुरांतुन विचरावें ॥

# एका चुकलेल्या पांखरास

[ चालः—श्रीमंत पतीची राणी० ]

भिरभिरा वरीं फिरताती
चिंवचिंवाट कलकल करिती
डाहळ्या धरुनि चरणांत
दोल्यावर डोले घेती
बोलवीत जगता बसती
परि तुला न कोणि बहाती
    पसरला पसारा वरतीं
    फुकटची गोड ओरडती
    कोणी न हांक तुज देती
एकेकापुरती प्रीती
एकेकाची या जगतीं ॥

२

एकही फळावर चोंच
रोंखिली न पोरा ! पुरती
निश्वास-श्वासमात्रानें
थरकती पिसें तव नवतीं

नीडांत नीज निववावी
आजची तुझी ही रीती
देखिली न माता पुरती ।
काशि मुकली हातोहातीं
काय बापुड्या ही नियती
आधारबंध तव तुटले
पेटलें तुला जग सगळें ॥

# बंदिवान हरिण

[ ' मॉडर्न रिव्ह्यू 'मधील Call of the Woods
या चित्रावरून ]

हांक पुन्हा आली वनींची हांक पुन्हा आली
बावरली वृत्ती क्षणैकचि तन्मयता त्याली
वटपत्रापरि ते उभवुनी कान ताठ दोन्ही
विशाल नयनांनीं पाहतो टक हा लावोनी
मान उंचवीतो देउनी ध्यान वनीं बघतो
मुहूर्त निश्चळसा राहुनी कान पुन्हा देतो
कोण दिसे त्याला दिसेना कोणहि नयनाला
हांक ऐकुनी ती जीव परि बांधुनिया नेला
दूर दूर गेली हांक ती खोल विरळ झाली
कालवलें पोटीं घेतली झांप त्याच काळीं
ध्यान कसें व्हावें पाश तो गळ्याभोंवतालीं
हिसकितांच झाला पाश तो फांस गळा अवळी
घे हिसके हिसके विचारें एकवटूनि बळ
उपहासें हांसे गळ्यांतिल ती घुंगुरमाळ
लाट उचंबळतां उचंबळतां वर फेस फुले
फेसाची लेखा मुखावर त्याच्या मग उमले.

# परी न आला गवळी अजुनी

अभर होउनी पय प्राशुनी
क्षितिजाच्या या गोठ्याआंतुनि।
पूर्णबिंब हें मधुर गोजिरें
पुष्ट वासरूं ये सामोरें।
छिन्न चांदणें–फेस मुखींचा ठायीं ठायीं हा गळलेला ॥

सायंतन या समीरलहरी।
लतामंडपांतुनी शिरोनी
पुष्ट कळ्यांना तोंडें लावुनि।
पितां पितां हुंदके देउनी ॥
पय प्राशितां फेस मुखांतुन शुभ्र फुलांचा गेला गळुनी ॥

उदंड बागडणारीं बाळें।
दिवसकरानें मिटतां डोळे।
मातांची त्यां जवळिक लाभे।
दूर कराया त्यां नच दावें।
स्तन्य पितांना झांपड पडुनी झोंपेमध्यें गेलीं विरुनी ॥

अभर–तृप्त. हुंदका–ढुशी. दिवसकर–सूर्य.

परी न आला गवळी अजुनी ।
भुकेजलेलें तान्हें, म्हणुनी ।
दृष्ट लावुनी दरवाजांतुनि ।
तरंगलें हें केव्हांपासुनि ।
मधेंच व्याकुळ होउन अगदीं करुण कुठावा करिते निसुनी ।।
चार हतांवर माय वेगळी ।
काय बापुडी असुनी जवळी ।
ओढ घेउनी मान मोडुनी ।
वरचेवर त्या पाही निरखुनि ।
अगतिक झाली स्वताच म्हणुनी पुसट उमासे देते तेथुनि ।।

कुठावा—पृच्छा, आक्रोश.

# हीं तों जनावरें प्रेमाचीं माहेरें

[ अभंग ]

नेली गाय त्यांनीं । रानांत ओढोनी ।
वांसरापुढोनी । हाय हाय ।
अधीर अस्थिर । जाहले चंचळ ।
घेवोनी उबळ । मागें धांवे ।
गळा गुंतलेला । तया ना कळला ।
पाऊला पाऊला । माय दूर ।
व्याकूळ डोळ्यांनीं । धावलें मागोनी ।
परी तेहि हानी । झाली आतां ।
दृष्टीआड माय । रानीं घेई धांव ।
ओढ परी काय । वांसरीसी ? ।
केळ आळ्यांतून । नेली उखणोन ।
तेथेंच ठेवून । कोळा कोंब ।

२

फाटतांना मेघ । भेगेंतून वीज ।
गळोनिया जाय । सवेग ती ।
वैरणीची काडी । मुखांतून पाडी ।
हंबरतां तेंवी । तोंडभर ।

# हीं तों जनावरें प्रेमाचीं माहेरें

[ अभंग ]

नेली गाय त्यांनीं । रानांत ओढोनी ।
वांसरापुढोनी । हाय हाय ।
अधीर अस्थिर । जाहले चंचळ ।
घेवोनी उबळ । मागें धांवे ।
गळा गुंतलेला । तया ना कळला ।
पाऊला पाऊला । माय दूर ।
व्याकूळ डोळ्यांनीं । धावलें मागोनी ।
परी तेहि हानी । झाली आतां ।
दृष्टीआड माय । रानीं घेई धांव ।
ओढ परी काय । वांसरीसी ? ।
केळ आळ्यांतून । नेली उखणोन ।
तेथेंच ठेवून । कोळा कोंब ।

२

फाटतांना मेघ । भेगेंतून वीज ।
गळोनिया जाय । सवेग ती ।
वैरणीची काडी । मुखांतून पाडी ।
हंबरतां तेंवी । तोंडभर ।

वांढविलें मुख । विकासले आंख ।
करुण ती हांक । पीळ पाडी ।
पसरोनी पांख । पांखरूं घे झांप ।
परी त्याचें पाप । पायीं सूत ! ।
तेंवी कान ताठ । चालो घेतें वाट ।
गळ्याची ती गांठ । दावा साधी ।
मायेचें मेघोडें । फोडी हंबरडे ।
ऐकतां आंतडें । चढे पोटीं ।

२

चित्तचक्षू देई । चित्रापरी राही ।
क्षणभरीं ठायीं । थिरावुनी ।
थिरावुनी पुन्हा । हांका देते राना ।
लांबवूनी माना । पुन्हा पुन्हा ।
धूमस्तोमांतील । व्यर्थची ती ज्वाळ ।
होतसे चंचळ । सुटावया—।
धारणापासोनी । नसे उगवणी ।
समाधान मनीं । तेंवी नुरे ।
पायींचा पाचोळा । केला चोळामोळा
पाण्याच्या परळा । उलंडिले ।

आंख—डोळे. मेघोडे—मेघ. धारण—खांब. उगवणी—मुक्तता.

४

हाक झोंक्यावाणी । क्षीण हो निदानीं ।
हताश होवोनी । भूमीं पडे ।
काळेभोर डोळे । कळासले तेणें ।
मुख दीनवाणें । पोटीं घाली ।

५

उमटलीं उन्हें । उजळलीं क्रमें ।
सांवल्या तेजानें । जळों जाती ।
उलटे मध्यान्ह । पालटलें उन्ह ।
छायांकुर आन । वाढ घेती ।
उन्हें सरकत । सौम्य होत होत ।
वाटची चालत । कीं घराची ? ।
अंतीं मावळतीं । जातीं उगवतीं ।
पटापट होती । नष्ट सारीं ।
उद्यांचे कोंवळे-। कर हींच बाळें ।
वत्स ते भुकेले । त्या पाजाया-।
सूर्यकर गाई । झाली त्यांना घाई ।
म्हणोनीच काई । उधळल्या ? ।
पानें हालवून । वृक्ष, पक्षी खूण ।
'याहो परतून' । ऐशी देती ।

कळासले—झांकले. मावळतीं—मावळतीं किरणें. उगवतीं—पूर्वेस.

पक्षी एकमेळ । होवोनी सकळ ।
वासवृक्षीं बळ । बांधितातीं ।

६

संध्येचा अंधार । व्हायाचा सुमार ।
दूर ते हंबार । ऐकूं येतीं ।
घांटा-घुंगुरांनीं । घुमविली सांज ।
आशेची उपज । पुन्हा पोटीं ।
मृताला अमृत । तेंवी झाली मात ।
रोमरोमांचित । वांसरी हो ।
कानांचे कोंवळे । विकासले कळे ।
उमलूनी आलें । अंतरंग ।
ओसरला मेघ । ओथंबे सवेग ।
प्रेमाची अमोघ । हांक द्यावा ।

७

हे तों पदाघात । धांवतची येत ।
माय हंबरत । ठायीं ठायीं ।
प्रेमाचे कल्लोळ । जाहले ते वेळ ।
कोणा असे बळ । वर्णावया ? ।
भेटल्या त्या दिठी । अंतरा त्या मिठी ।
आतां ताटातुटी । नसो देवा ।

८

आईला भेटलें । प्रेमानें हुंगिलें ।
परि न चाटलें । अंग तुझें ।
तुझें मन धालें । रूप तिचें प्यालें ।
परी पोट ओलें । कैसें होये ? ।
निशेचें पाडस । सांज हें गोंडस ।
नुकतें गोरस । प्यालें भासे ।
स्निग्ध दुग्धबिंदु । आकाशीं सांडले ।
अजोनी वाळले । नाहींत ते ।
व्योमाच्या गोठ्यांत । तमाच्या ओलींत ।
दूध मिसळत व्योमगंगा ।
तुटल्या ज्या तारा । काढील्या त्या धारा ।
देवांनीं अधीरा । आतांच ना ? ।
थांब थोडें बाळ ! । येईल गोपाळ ।
तोंवरी ही कळ । काढीं पळ ।
गाईन मी तुला । तरी गाणें बाळा ।
यशवंता लळा । तुझा असे ।

# ‘ हरिणी ’ आणि ‘ चमेली ’

जातां मी जवळी लगेच पुढतीं ये पाउलें चालुनी,
दावें संपुनि जाय बापुडि तिच्या यावें कसें हो मनीं ?
नेवोनी जमिनीस मान मग ती तेथेंच ती हालवी,
प्रेमानें मज पालवी ‘ क्षणभरी खाजीव ’ हें दर्शवी !

२

प्रेमाचें अगदीं भुकें मुख तिचें बाहूंत आलिंगुनी,
मानेनें मग घासतां हळुहळू संतोषली जी मनीं;
नीलस्निग्ध विशाळ दृष्टि मिटुनी कीं आंसवें आवरी ?
स्थूल स्थूल उदास हेंच सुचवी उच्छ्वास तीचा परी !

३

अभ्रांच्या बुरख्यात वीज उजळे ती मंदभासा जशी,
हस्तस्पर्शहि हालका पुलक तैं देई किती हो तिशी;
लोटाया विधुबिंब दूर, जळिंच्या लाटा जशा घोटती,
‘ घ्यावा हात दुरी ’ असेंच मजला रोमांच ते सांगती !

४

होतां वेळ सकाळ सांज अगदीं पाजावया पाडसा,
झाली तन्मय प्रेमपूर्ण नयनें ज्या पाहतां पाहतां;
लावीना मुख वैरणीस नुसतें ती सारखी हंबरे,
हांका दीर्घ तिच्या अजून परत्या झाल्या न कानांतुनी !

५

राता रंग जयास फार खुलवी पाठीवरी पांडुर,
तेणें जें सुकुमार शुभ्र, दिसलें भारीच चेतोहर
शोभे लाल गुलालची उधळिला कीं पुष्पगुच्छावर
रक्तपृष्ठ उषाच वा उतरुनी आली स्वयें भूवर!

६

काळेभोर विशाळ, मर्मरपुटीं कीं नीर तें निर्मळ-
डोळे स्निग्ध जयांकडे निरखितां स्नेहाळतें अंतर,
फेनस्पर्धि, पराहुनी मृदुलता घे रम्य वक्षःस्थळ
तें माझें मज लाडकें त्यजुनिया गेलें दुरी ना तर ?

७

मागें बागडुनी मुहूर्त पळते पांहाट रात्रीकडे
गाईमागुन धांवलें, मन अतां कां मागुती धावडें ?
गेलें पुष्प गळोनि ज्यांतुनि अशा त्या वेलनालापरी
भासे त्यासम वांसराविण अतां हें दाम भूमीवरी!

पांहाट—पहाट ही रात्रीची वांसरी.

# घातला फांसा तव जीविता

महदपराधी खराच सखया! प्रेमें तुज स्पर्शिता
घातला फांसा तव जीविता ॥ धृ० ॥
रूपसुंदरा! मुखर पांखरा! कलकाकलि परिसतां
अंकिलें मन झालें तत्त्वता ॥
चूताच्या नव नील पालवीपरी तुझ्या श्यामला
देखतां पक्षपुटा कोमला ॥
श्यामलपल्लवपुटीं खुलावी दंवाबिंदूची युती
तसे तव लोचन हे शोभती ॥
चोरटें रूपडें देखुनिया चिमखड्या!
वोढविला कर हा नकळत माझा गड्या!
स्पर्शुनी लागलों या मार्गा वांकड्या
आम्रतरूचा तुराच गळला वर पांखर पसरतां
घातला फांसा तव जीविता ॥

२

कुतुकातिशयें कुरवळिलें तुज थोपटिलें चुंबिलें
कपोलीं नेउनिया लाविलें ॥
पुन्हा पुन्हा तव चोंच चिमुकली अंगुलिनें स्पर्शिली
नासिका तनुशीर्षीं टेकिली ॥

पांखर—मेघांची पांखर. तनु—चिमुकल्या.

चंचळसलिलागळीं प्रकंपित पक्षपुटें ओष्ठिलीं
जशी नव अर्धोन्मीलित कळी ॥
मग पुरता मनिंचा सोस तसा तत्त्वता
कौतुकें देखण्या तुज उडुनी धांवतां
स्थापिलें करतळीं ' मुक्त, सख्या जा अतां '
परि नच हलसी परि नच डुलसी स्वस्थ कसा तूं अतां
घातला फांसा तव जीविता ॥

३

क्षणैक बसते पुढयात उडते हातवेरि मुरडुनी
मनापरि येत येत परतुनी ॥
होकारुनि बारिक बोला तव चिंवचिंव जी बोलली
उडाया शिकवित तुज बैसली ॥
मायाजाळीं कटाक्षटांके देउनि तुज गुंफुनी
टाकिलें जिनें लतांतरुंतुनी ॥
ती पळाआगळी माय न येथें अतां
आवरुनी मायाजाला–तव जीविता,
घेउनी निघाली हतभाग्या रे हता !
स्वातंत्र्याची कठिण कसोटी द्विज इतकी लावितां !
घातला फांसा तव जीविता ॥

४

बहलपल्लवित अति रोमांचित कलेवर-तरूवरीं
सुखें तूं नीज हृदयकोटरीं ।।
स्मृतिशेषा ! तुज आठवणींचे गोड घांस वाढुन
यापुढें मीच तुला भरविन ।।
सुखदुःखाच्या सांवलींत वा उन्हांत तूं सोबती
जीव जैं देहाच्या संगतीं ।।
जागवीं उषा प्रतिभेची तूं पांखरा ।
रिझवीं तिज काढुनि चतुरा ! मधुरा गिरा
स्वच्छंद क्रीडुनी ओसरता दिन खरा
उतर कोटरा आटोपुनिया पक्षपुटें मागुता
घातला फांसा तव जीविता ।।

# माझा आवडता ससा

जरी बैसले मंगळ येउन लोललोलशा नेत्रात ।
तरी न बेटा कराल आहे, कातर साऱ्या मुलखांत ॥

२

नीच वासना देखुनि जगतीं, छातीच्या या खाचेंत ।
काळिज लपलें तेव्हांपासुनि, भयभीतीनें धडधडत ॥

३

तसाच माझा निर्मळ प्रेमळ, प्रेमविसांवा असा ससा ।
निषादपाशें भीत कंदरीं अद्रीहृदयीं दया जसा ॥

४

हिमासम जरी शुभ्र शोभतो हिम प्रकृती जरि याची ।
तरी जागती गोड ती किती ऊब आंतल्या ज़ीवाची ॥

५

कानकेवडे उभारुनिया सान मान हा डोलवितो ।
प्यार सोबत्यापाशीं हितगुज करितांनाही थरथरतो ॥

६

कापसापरी मऊमऊशा कायेच्या या पिशवींत ।
प्राणांची मखमाली पिशवी किती कोंवळी ती आंत ! ॥

७

पेशी फोडुन जगतीं आला तरी दिसे हा पेशीच ।
आंत नांदतो जीव एकला घालुन पेशीचें कवच ॥

८

जणों दह्याची कवडी किंवा मूक मुकुलिकाच हा दिसे ।
मूक दिसे पर फार बोलका या जीवाचा दोस्त असे ॥

९

निरपराध गुणमंडित असलीं वसुंधरेचीं सुभूषणें ।
नाहक छळिलीं आजवरी त्या जनविश्वाचें जळो जिणें ॥

# पोरी !

विपुलपल्लवीं आतुडलेलें
नीड जसें पक्षाचें ।
बहलकुंतलीं तसें गुंतलें
बालबिंब वदनाचें ॥

२

उजळ उषेपरि प्रसन्न होतां
टवटवीत तव वदन ।
चिंवचिंव करिती चिमुकलेच ते
शब्दपोत आंतून ॥

३

उगाच काढुन इवल्या चोंचा
आंत पुन्हा लपतात ।
अर्धस्फुट तैं बोल बोबडे
अधरपुटीं स्फुरतात ॥

४

केतकापरी गौर गोवुनी
गळ्यांत माझ्या हात ।
तोंड भिडवुनी तोंडा अविरत
करिशि किती आकान्त ॥

५

मिळे न प्रत्युत्तर तव बोला
तरि न तुला अवसाद ।
उत्कंठित कोकिळा घालिते
उत्कटतर मग साद ॥

६

तुझ्याजोगता अन्य न येथें
चेलगडी रंगेल ।
असमंजस बोलुनी तुझ्यापरि
जो तुजला रमवील ॥

चेलगडी—खेळगडी.

## सिंधूरस

चिमुकल्या चांदणीपरि तव पोरी। प्रेमाचा बडिवार॥धृ०॥
कुरळशा केशकुंजांत।
भ्रूलता सारख्या चालित।
कीं तेथ विसावत कोकिलयुगुलचि लोचन काळेभोर॥

२

वात भरुनी शीड फुगलें।
तेंवि दिसती गाल फुलले।
नाकाची नाजुक डोलकाठि ही तोलुनि धरते गाल॥

३

लुसलुशीत राते ओठ
उघडितां एकला दांत-
हो व्यक्त, निघाली नारिंगाच्या फोडींतुनि बीं वर॥

४

आंब्याची पातळ कोय
हनु तेंवी शोभुनि जाय
मोकळा मुलायम गळा कोंवळा कदलीदलसुकुमार॥

५

वदन तें उचलुनी वरती
उभवितां हात ही मूर्ती
वाटते आपुल्या कंठीं आपण गोवावा हा हार॥

# मी मनांत बाला झालें

बाळपणींचा काळ सुखाचा आठवतां घडिघडी.

[ चाल:--अजि हौस जिजीची पुरवा० ]

मी मनांत बाला झालें
घेतले सुखाचे झोले ॥ धृ० ॥
पंजरीं सोनियाच्याही
झुरतसे सारिका पाही
मानसांतील हंसाचे
लावुनी पंख सोन्याचे
हे विलास लाथाडून । काळाच्या शेतांतून ।
बाल्याच्या चाक्यावरुन
सर्व झाड मीं बोलविलें
मी मनांत बाला झालें० ॥

२

दिवस तो डोइला येतां
घेउनी शिदोरी हातां

शेताच्या माचीं जातां
हीं भाकर वोपिलि ताता
शाळूच्या शेतांतून
मोदानें फिरलें फिरुन
फिरतांना शेतांतून। पांखरें दिलीं उडवून।
पांखरापरी परतून
झाडाच्या सावलिं आलें
मी मनांत बाला झालें० ॥

२

दिवस तो बुडाया आला
घेतला घडा पाण्याला
गोपांनिं गाइ वळवील्या
पाजाया पाणोठ्याला
डोइला घेउनी भारे
परतले शेतकरि सारे
त्यांसवें गीत गाऊन। वाट ती थोडकी करुन।
मी घरा अलें परतून
मग गाइ पिळाया बसलें
मी मनांत बाला झालें० ॥ २ ॥

वांसरें अधिर तीं झालीं
ओढ घ्यावयाला सजलीं
लांबवूनि अपुल्या माना
चाटिती गाइगुजि त्यांना
जणुं हितगुज करिती कांहीं
" येऽग ती माझी बाई। "
पाजुनि त्या प्रिय पोरांना। मी दूर करुनि दोघांना।
तोडिलें म्हणुनि का मजला
शैशवांतूनि ओढियलें?
मी मनांत बाला झालें० ॥ ४ ॥

## एक दृश्य

न्हालेले मृदु केस ओलसर जे पाठीवरी लोळती
वांकाया सजतांच ते तव मुखा झाकावया लागती
गालांना रुचतो न नाजुक जरी संसर्प त्यांचा तुला
ग्रीवाभंग कपोतिकेपरी तुझा धिक्कारितो त्यांजला

# चुंबुनी झांकूं दे तरि मला

बारिक बारिक सतार-तारा-परि मंजुळ बोलशी
अखंडित सूत्र दिव्य निर्मिशी ॥
अभिनव नाजुक मृदुहासाचे गजरे गहिरे सखे
गुंफिशी त्यांत एकसारखे ॥
चंद्रिकेपरी परिहासाचा सुधासेक त्यावरी
कळ्या मग कोमतील कां तरी ? ॥
वाटतें सारखें हुंगावें त्यांजला
हृदयाचा गाभा करुनि पूर्ण मोकळा
कोंडुनी धरावा परिमळ हा आगळा
दृष्ट तयांला खास लागली न कळे मुग्धे! तुला
चुंबुनी झांकूं दे तरि मला ॥

ग्रा. क्र. ४०२५

# गर्द ढगावर

गर्द ढगावर चमकुन पडते सरळ विजेची छडी
तेविं हा भांग शोभतो शिरीं ।
तकतकतो कचपाश स्निग्ध नव तलम तापत्यापरी
विकसला मोरपिसारा तरी ।
कानाची शिंपली उमलुनी नुकती पदली दिसे
कुडी नव मोत्यापरि भासते ।
पालवुनी पाखांस कपोती क्षणाक्षणा क्रीडती
तेवि भ्रूलता तुझ्या हालती ।
सरळ नाक नाजूक गुलछबूकळीपरी कोंवळें
सुगंधिक श्वास संथ दरवळे ।
मधुर ओंठ पाटल त्या खालीं रदनावलि झाकली ।
मंजुषा रत्नांची मखमली ।

# गोड आठवण !

पदापदाला निर्भर अभ्रा सिताचला सांवरी
इंदुकला अंबरीं तशी तव मोहमूर्ति मोहरी
अकृतमधुरशा मंद पदन्यासें हृदया तुडविलें
म्हणुनि साजणी! येउनि सहसा करास मीं कवळिलें
वात झोंबतां आम्रमंजिरिस मोहर घळघळ गळे
कंपित वपुवर रोमांचाचे सर सुंदरि! वोळले
श्रावणमासीं हिरव्या शेतीं ऊन-सांवली पडे
लज्जाहर्षें पुरेपुरे तुज तैसें झालें गडे !
टवटवीत जे गुलाब गहिरे गालांवर रेखिले
जड निश्वासें तुझ्याच सुंदरि! उमलाया लागले
कर ओढुनि वांकुनी रोखिलें नम्र मुखाला जसें
स्तिमित जाहले विशाल लोचन लाजेनें राजसे !
शशिलेखांपरि अर्धनिमीलित नयन तुझे भासले
पुसट चांदणें लाजेचें लाजरें मुखीं पसरलें

# दुःसह स्मृति

‘ तुझाच हो ! पण पाहुंदे तरी येवढा न विश्वास ? ’
गुलाबाहुनी मृदुल वचांनीं गुलाब तूं हरलास
मनांत नव्हतें परि नच झाला धीर निवारायास
बळजोरीनेंच कीं करांतुनि हिरावुनी नेलास
येवढेंच नच हुंगुन आणिक लावुनि ओष्ठपुटांस
वक्षस्थळिं स्थापिलेस पाहुनि पुन्हा पुन्हा अरशात
रुचिर बालका कवळुनि वक्षीं लावुनि मुख स्वमुखास
लक्षितात आरशांत प्रमदा तेंवि गोड तो भास
मधुर उषा आरक्त रक्त तें बालभानुचें बिंब
‘ बिंबप्रतिबिंबभाव ’ किंवा प्रकट जाहला सांग

* * *

‘ दे तर आतां परत मागुता गुलाब माझा मजला ’
स्मित उपचारें सहज वदावें तेंहि न झालें मजला
संथपणें गंभीर मुखानें पसरियला मी हात
शशितेजोभंगास टाकला शामल मेघ समीप
उज्ज्वल रंगावलि विरघळते सलिलाच्या सेकानें
विरमलीस मम निर्मम वचनें मुख थिजले लज्जेनें

सांग—पूर्णपणें. रंगावली—रांगोळी.

प्रातःस्पर्शें जेविं शोभते सरती चांदणि रात
लज्जाकुल हास्यानें खुलला किंचित वदनप्रान्त
लोभ न सुटला परि पुष्पाचा पुन्हा पुन्हा त्या हात
लावुनिया उरिं पाहिलेस कीं, बसला आहे नीट
वळवुनिया मुख त्याच गुलाबीं टाकित नेत्रकटाक्ष
डावा उर किंचित् उचलोनी किंचित् येशि समीप
सरोष तेव्हां वदलिस ' उचला गुलाब तुमचा तुम्ही
चुकलें मी नच विटाळीन त्या पुन्हा कधीं या जन्मीं. '

# उमलुनि वायां जाउं नको !

उमलुं नकोग उमलुं नको, उमलुनि वायां जाउं नको ॥

नाजुक नाजुक रम्य मनोहर
अस्फुट हें तव कोडें जोंवर
विमल माधुरी टिकेल तोंवर
मुग्धपणाचें स्वप्न भंगतां, भग्न तुझे होतील मनोरथ

२

पाचूच्या झुंबरांत ज्योती
स्निग्ध भोंवतीं पसरी दीप्ती
आकाशीं वा जशी एकटी
शुक्राची तेजाळ तारका, तशी तुझी ग मोहनमूर्ती !

३

वा जगताच्या दृष्टीआडुनि
अजातपक्षी कोटरांतुनी
लक्ष लावुनी लक्षी अवनी
अभिनव अर्धस्फुट रूप तुझें, आतुडतें अंतरास माझ्या!

४

बोल बोलण्या बालक सजलें
वर्ण पूर्ण ते व्यक्त न वठले

अजात–पंख न फुटलेला. आतुडतें–आकर्षितें.

बाल-काकली तसेंच गमलें
रूप तुझें, तूं उमलुनि आतां व्यर्थचि वायां जाउं नको !

५

हात झाकला काढुनि नेला
मधुर सुधेचा भरला पेला
कां सजलिस तूं ओतायाला
सुधा संपतां चंद्रकोर ती, जात न कां काळोखा मिळुनी?

६

वारा कुजबुज करितो कानीं
तुझ्या भोंवतीं आळी घेउनि
बसला म्हणतो जा उमलोनी
क्षणांत मातीमोल करोनी, टाकिल परि मातींत मिळवुनी

७

अविचारानें जाशिल फुलुनी
पळांत दुसऱ्या जाशिल गळुनी
शोभे तारा—जोंवर गगनीं
तुटोन जातां निष्ठुर जगतीं कोण तयाची कणव करी ?

कणव—कींव.

# गति दोल्याची

राग मेघमल्हार ( बिजली चमके बरसे० )

गति दोल्याची सखये द्रुततर। मधुर करी लयींत करकर
दूर जाय परि होइ पुरस्सर ॥ धृ० ॥

पदर पाठमोरा वाऱ्यावर
शुभ्र केळिचें पानाचि पातळ
कोक्यापरि क्षण कंचुकितस्तन। होत सुदर्शन ॥

२

भर भरता झोक्यास भराभर
कुंतल करिती भालीं भुरभुर
उचलोनी सुकुमार करा वर। सांवरिशी त्यां ॥

३

पतंग पडती दीपकळींवर
मुखा झडपती समीर आतुर
विकृतिमधुर तें अधिकचि सुंदर। जेविं जलाशय ॥

४

तुंग तरंगीं या दोल्यासह
सानथोर प्रतिपळा तनू तव
तमातपीं बाहुली विकासन। पावे जेवीं ॥

दीपकळी–ज्योत. बाहुली–डोळ्यांतली बाहुली.

# गायिका

वामोत्संगा मृदुलतर त्या स्थापुनी गालिच्यास
सव्योत्संगा उभवुनि वरी ठेविशी कोंपरास
वामस्कंधीं सहज मग तूं सारुनी अंचलास
छेडायाला करकिसलयीं सज्ज होशी सहास ॥

२

हस्तस्पर्शें मुखर करिशी चेतनाहीन तारा
सांद्रास्निग्धा चढत भरती संथ नादोदधीला
वर्णातारा नियमितगतीं हस्त हा जेविं छेडी
भासे डोले विकसुनि फडा नागिणी नादवेडी ॥

३

वीणा आणी मधुर तव ती वाणि मंजूळवाणी
स्रोतःसंगीं प्रथित करिती एकची नाद दोन्ही
किंवा व्योमाक्षिति मिसळुनी एकमेकीं विलीन–
होता व्यक्त क्षितिज. तइं ते सूर संगीन पूर्ण ॥

४

आलापांच्या किति उमटती वर्तुळाकार लाटा
ठेक्यानें त्या जणु क्षणक्षणा देति साजास थापा
नादब्रह्मार्णवि शशिमुखी! येत भर्ती भरला
खाडया श्रोतृश्रवणहृदयें पूर्ण आल्या उताला ॥

५

गातां गातां स्थिर करुनिया सूर तो लांबवीशी
आलापांनीं सहज मग त्या सारखा पालवीशी
वाटे काठी जणु उभविली उंच ती कांचनाची
अग्रीं लोलाकुल फडकते कीं पताकाच खाशी ।।

६

जातां सारें दहिवरुनि तें दाट घर्में कपाळ
पाटाकाठीं भिजलिं गवतें तेविं ते अग्रबाल
ईषत् अभ्रें स्तिमित दिसतो जेविं तो चंद्रगोल
हातें तेंवी जपुनि वदना लाविशी तूं रुमाल ।।

७

गानावेशें श्रमित सहजीं, घेशि जैं विश्रमास
आणी हातें सहज वरती सारिशी पालवास
भासे भीती तव जणुं त्यजी स्वासनासी अपाप
वक्षाचा घे मृदु मखमली कंचुकींमंच कंप ।।

# केशभूषा

[ चाल:–भूपती खरे ते० ]

उमटुनी उषा कासार प्रफुल्लित झालें ।
त्वद्बिंबें दर्पण दर्शनीय हें झालें ॥
मोकळा नितळ हा केशभार विस्काळित।
तरुछायेसम हा मुकुरीं निस्वन चलित ॥
नीलाभ जळांतुन चंचळ चळती मीन ।
बिलवरी दर्पणांतुनी तरळती नयन ॥
क्षण मधेंच होउनि दंग थाबसी ।
एकाग्र देउनी दृष्टि पाहसी ।
निमिषांत परी अपरीं त्या थरकसी ।
स्वैर तें सराइत कंकत सर्पे हातीं ।
कांकणेंच नुसतीं नादावुनिया जाती ॥

२

गर्दशा पहाडातुनी शुभ्रसा स्रोत ।
घालतो उडी; तइं मानेची तव मात ॥
हेलावत हलका वात वाहन ।
दीपकळी कलते खालीं मोहन ।
पालवीस झटतां जैसें तें सुम ।

मुकुर–आरसा. कंकत–फणी. दीपकळी–ज्योत.

कचकलाप हळव्या हातें कवळुनि धरितां– ।
विंचरितां, वळली मान मुलायम आतां ॥

३

विंचरीत वीची जळवंतीजळ जाते ।
तइं बहल केशपिंजरींत कंकत रुळते ॥
कचकलाप–कोमल तारा जुळवुनी ।
टाकिली मान त्या वरतीं गुंगुनी ।
सरकते सलील वरोनी ही फणी– ।
लेखनी ' ललत ' रागाच्या लोटी लाटा ।
विरघळुनी गेला जीव त्यांत चौवाटां ॥

जळवंती–नदी. लेखनी–गज.

# माझा जाईचा वेल

आशेचा वठला पुन्हा विटप कीं लेई नवी पालवी
तैसा पालवुनी फुलोनि डुलतां शोभा तुला ये नवी
प्रत्यूषीं फुलतां फुलें, नवनवें लाधें तुला यौवन
न्हालेल्या कुसुमांपरी भरुनिया ओलावले लोचन

२

ज्या हातें तुज वाहिलें चिमकुल्या, बागांत या माझिया
प्रेमें सांजळतां सच्यांतुनि जयां मीं पाजिलें रे पया
पुष्पांनीं लढतां अतां रुचिर हे उन्मेष तूझे नव
झालें आज कृतार्थ अंतर तसे विश्रांत माझे कर

३

सूर्याच्या जळत्या झळी करपुनी देतील सारी मही
दृष्टिक्षेपहि दग्ध होउनि जधीं जातील तेजोवहीं–
वारेही बनतील पोत जळते ऐशा निदाघांतरीं
तूझ्या शीतळ सावलीस बसुनी गाईन गाणीं बरीं

४

चंद्राचा गहिरा गुलाब वदनीं गंगोदकाच्या परी–
लेई पातळ पातळास धवला त्या चांदण्याच्या, वरी;
ध्वांताचा कचपाश सारित करें येतां सखी यामिनी
भेटाया तिजला सजेन सखया! तूझ्याच कुंजान्तरीं!

५

मेघांच्या क्षितिजावरी उमटुनी गंभीर धीराकृती
छाया आयत पालवूनि भुवनीं अंधार विस्तारती
दिग्द्वारें अवरोधुनी घनतती वाऱ्यासही रोखिती
ऐसे दुर्दिन दाटतां तव मुख-श्री फुल्ल होईल ती

६

घेवोनी परडी करांत खुडण्या तूझीं सुमें कोमल
येतां त्या चिमण्या उडोनि तुझिया कुंजांतुनी जातिल
त्यांच्या पेलवपादपीडनिं तुझे दोलावुनी अंकुर
मोत्याच्या स्खलतील बिंदुकणिका तारांतुनी जैं दंव

७

कोठें होउनि राहिली दिसतसे दाटी फुलांची, कुठें
चूडाचुंबित एकटेंच सुम तें वाऱ्यावरी डोलतें;
कोठें बाळकळ्या फुलां लगटुनी डोकावितां मोहिती
भावंडांस कडेवरी धरुनिया वाटे मुली खेळती

८

होतां कातरवेळ ती परतुनी येतां घराला गुरें
ओढ्याच्या झुळत्या जळांत शिरतां तीं गोजिरीं वासुरें;
पाण्या लावुनिया मुखा उचलिती माना पुन्हा त्या वरी
तैशीं रम्य फुलें सुदर्शन तुझीं वाऱ्याचिया ओझरीं

९

जातां ओसरुनी प्रकाश सगळा व्योमान्तरालांतुनी
घेतां मेघमुखें क्षणैक उजळा सानंद संध्यागमीं
रेखा तांबुस ज्यांवरी उमटल्या ऐशा कळ्या कोंवळ्या
तान्ह्यांच्या चिमण्या मुठीच मिटल्या होतील तैं मोकळ्या.

१०

धारासार तुला कधीं झडपुनी मोठ्या बळें टाकितां
आधारा धरणीस घट्ट धरण्या बाहू तुझे वांकतां
किंवा पुष्परजांपरी बरसुनी उद्ग्रीव होतां शिरें
शोभा भिन्न जरी तरी नच वरी, आनंद रूपान्तरें

# मेलेली जाई

संतत पर्जन्याची झिरमिर
क्षणभर भासे झाली विज्वर
स्थूल बिंदु नच–टपोर मोती–
तुटत न थुइ थुइ धरणीवरती
परागापरी पातळ झालर
पर्जन्याची हेलावत वर
नच भिजवाया परि रिझवाया ॥

२

मेघांचें फाकुनिया डंबर
उजळ झरोके क्षणभर ते वर
आणि खालती हिरवाळीवर
झाडांच्या पाना-पानावर
नरम तजेला नाचत निर्भर ॥

३

उदास अंतर उमलुनि आलें
उल्हासानें लोचन फुलले
मोरपिसापरि चकित जाहले
अतुल हरित तें प्रशान्त सुंदर

दृश्य देखतां मिटले लोचन
श्वास घेउनी दीर्घ दीर्घतर
आघ्राणियलें मधुर दिगंतर ॥

४

पायतळीं पल्वलें चिमोलीं
चरणचालिनें चंचल झालीं
ललित पल्लवीं शुभ्र फुलें तीं
फुलबाजीपरि बिंदु ढाळिती
आर्द्रलताकुंजांतुन होती
मोत्यांचे अभिषेक खालतीं ॥

५

जलबिंदू दाटले फुलांवर
फुंकर घालुनि केले मी दुर
फुलझाडें हातांनीं हलवुन
सलिल-जाल तें दिधलें उधळुन ॥

६

गोठ्यांतिल ओल्या भूमीवर
फेसांचे कीं पुंजच अभिनव
जलकणिकांनीं दंहिवरलेलीं
शुभ्र फुलें दिसलीं तों गळलीं

# मेलेली जाई

संतत पर्जन्याची झिरमिर
क्षणभर भासे झाली विज्वर
स्थूल बिंदु नच–टपोर मोती–
तुटत न थुइ थुइ धरणीवरती
परागापरी पातळ झालर
पर्जन्याची हेलावत वर
नच भिजवाया परि रिझवाया ।।

२

मेघांचें फाकुनिया डंबर
उजळ झरोके क्षणभर ते वर
आणि खालती हिरवाळीवर
झाडांच्या पाना-पानावर
नरम तजेला नाचत निर्भर ।।

३

उदास अंतर उमलुनि आलें
उल्हासानें लोचन फुलले
मोरपिसापरि चकित आहले
अतुल हरित तें प्रशान्त सुंदर

दृश्य देखतां मिटले लोचन
श्वास घेउनी दीर्घ दीर्घतर
आघ्राणियलें मधुर दिगंतर ।।

४

पायतळीं पल्वलें चिमोलीं
चरणचालिनें चंचल झालीं
ललित पल्लवीं शुभ्र फुलें तीं
फुलबाजीपरि बिंदु ढाळिती
आर्द्रलताकुंजांतुन होती
मोत्यांचे अभिषेक खालतीं ।।

५

जलबिंदू दाटले फुलांवर
फुंकर घालुनि केले मी दुर
फुलझाडें हातांनीं हलवुन
सलिल-जाल तें दिधलें उधळुन ।।

६

गोठ्यांतिल ओल्या भूमीवर
फेसांचे कीं पुंजच अभिनव
जलकणिकांनीं दंहिवरलेलीं
शुभ्र फुलें दिसलीं तों गळलीं

" खरेंच ! आतां श्रावणकाळीं
सुगी जाइची आली जवळी
नक्षत्रें दाटती निराळीं
त्याहुन फुलतिल फुलें आगळीं "
मधुर कल्पना-बिंदु-स्खलनीं
तरंग विस्तारले किति मनीं ? ॥

७

गुंग तरंगीं समीप गेलों
हर्षें वेंचायास वांकलों
तोंच धनुकलीपरी उलटलों
मुहूर्त खेदें थरकुनि गेलों
कारण जाणिव खरीच झाली
ही नच जाई परी साइली ! ॥

८

कोठुनि फुलतिल फुलें जाइला ?
देह तिचा तर वठुनी गेला
संजीवक पर्जन्यसुधाही
जीवन द्याया शक्त न होई !

निराळीं—आकाशांत.

पर्जन्याच्या अमृतसिंचनीं
दगडहि फुलती मखमालांनीं
परी भिजोनी चिंब आजवर
तसेंच पडलें हिचें कलेवर ॥

९

या करिंच्या ओंजळी पिवोनी
वाढली किती सरसावोनी
आशीर्वच द्यायास करांनीं
संप्रति परि परमेशकरांहीं
मेघकुंभ ओतत असतांहि
जीवकला दाखवीत नाहीं ! ॥

# काढिशी करुणपूर्णशा वचा !

[ उदास मनाला सर्वच गोष्टी उद्विग्नता आणतात.]

दिवस उगवला नाहीं पुरता तोंच काढिशी कशा ।
अशा या करुणपूर्णशा वचा ? ॥
रात्रीचे संतापव्याप रे ! निवले ना अजुनि ते ।
तळमळे अंतर नच हो रितें ॥
क्षितिजांतुन झुळका सकाळच्या शीतळ ।
वाहून आणितिल भुरुभुरु नव परिमळ ।
दग्ध या हृदीं घालतील कीं फुंकर ।
उदास आशा उगाच हृदयीं, खिन्नच ही तर उषा ।
काढिशी करुणपूर्णशा वचा ॥

२

गोरेंमोरें दिसतें अगदीं दीन जगाचें मुख ।
जाहले वारेही विन्मुख ॥
अलक वारुनी मुळिं नच वरतीं वृक्षलता पाहती ।
उदासी कुढति स्वतःशीं किती ॥

फुलें सुगंधी अपुल्या गंधीं मुदमरलीं भासती ।
अडकले द्रिज ते क्षितिजांत कीं ? ॥
अस्मान बिलोरी आयत हा आरसा ।
फांसला चुना अभ्राचा त्यावर जसा ।
बिंबेल कशी मग उषा त्यांत राजसा ! ।
मळभ मनाला अधिकच करितें खिन्न, कशा मग अशा ।
काढिशी करुणपूर्णशा वचा ॥

# अर्धोन्मीलित.

अर्धोन्मीलित कुंदकोरकयुता माला फुलांची कुणीं
प्रेमें अर्पियली पित्यास; सदनीं गेलों त्वरें घेउनी
फेनस्पर्धिरुचा अतीव मृदुला मालेस त्या मोहुनी
साम्य स्निग्ध सुगंध घेत बसलों जैं वातवीची वनीं
कंठीं टाकियलें लपेटुनि तिला तों वाटलें मन्मनीं
नक्षत्रें खुडुनी निशाकरकरीं कीं टाकिलीं गुंफुनी
वारंवार करांजलीं कवळुनी गालीं तशीं लोचनीं
लावोनी वदलों 'सुमासम जगीं अन्या नसे मोहनी'
स्वप्नाची फुटतां पहाट शयनीं गेली विरोनी स्मृती
माला मावळली मनांतुनि जणों आकाशगंगाच ती
गेलों मी दुसऱ्या दिनीं परतुनी माझ्या यदा खोलिंत
माला सांपडली मलूल अवघी निर्गंध निस्तेजित
ज्यांचें कौतुकही न पूर्ण करण्या कोणी जया लाभत
ऐसे रोज किती गुणी नर जगीं जातात हो मातिंत

# काय माझी लाज

[ अभंग ]

काय माझी लाज सांगों तुज देवा ।
तूंहि धि:कारावा मायबापा ।।
पुरुष नांवानें विकतों लौकिकीं ।
अंतरीं भीतीचा बाइल्या मी ।।
त्वेषें घ्यावी उडी तेथें मुरडतों ।
अपमान खातों मेल्यावाणी ।।
काय तें जळोन स्वत:ला जाळोन ।
जरी माझा क्षेम रिपू राही ? ।।
कमाविली काया लोखंडापरीस ।
परी हिणकस मन देवा ! ।।
खांबापरी मान, चौरंगासमान ।
छातीचें आसन उभारलें ।।
शुंडासम दंड शोभेचे उदंड ।
तेजाविण लंड पोकळ ते ।।
तेजाविण देह राखेचा तो ढीग ।
चाचपावा मग धसानींही ।।

नको तो धिप्पाड देह जीवापाड ।
मेघांतील वीज सजों दे रे ॥
वळीव स्नायूंचा पिळीव हा देह ।
चैतन्यावांचोन चिलखत ॥
अस्थी चर्म मांस मढीव न्याहाली ।
पायमालीखालीं मळावी ही ॥
अपमानें कैशी स्फुरणें फुगेल ।
टांके तुटतील केवीं तिचे ? ॥
मेलेल्या मढ्याचें मुर्दाड कातडें ।
भोंवरा न पडे कदाकाळीं ॥
कासया ही होवी धुराची काळोखी ।
तेजाची झळाकी मुळींच ना ॥
मेघाचें उदर फाडाया अधीर ।
ऐशी वीज मज होऊं दे रे ॥
हुंकार फुंकरे ठिणग्या उधळी ।
अंगारइंगळी होऊं दे रे ॥
काय तें वो पुष्ट पुष्पाचें पांखरूं ।
कांट्याची बोंचरू चोंच नाहीं ! ॥

जीवापाड—जीवापेक्षां प्रचंड. न्याहाली—गादी.
बोंचरू—बोंचणारी.

# निराशा

( चाल—सहज चालतां० )

बाल्याचें मागुतींच गेलें मधुर मुऱ्हें ओसरून्
चिर शांतीचें शीत चांदणें—तेंहि न ये मोहरून् ॥
मृदुल पाकळ्या गुलाबपुष्पांतुन गेल्या त्या गळून्
बाल्याचे कल्पना-पंख तइं पडले सारे जळून् ॥
आशेचे पुष्पकोश कोडें चुंबावें हें धरून्
तलम मलमली पेलव पांखें वल्हवित आलों दुरून् ॥
पुष्पांचा ताटवा पेटला हाय हाय परि करून्
ज्वाळांच्या सांवल्या तापल्या उन्हांत हलती चळून् ॥
पाजळलेल्या पुष्पांची ती राखच सांडे वरून्
त्या छायांचे चटके जाती हृदयाला डागळून् ॥
आर न इकडे पार न तिकडे मृत्यू न दिसे दुरून्
बाल्याचा कोश मीच तिकडे हाय अलों पोंखरून् ॥
प्रसन्न सलिलीं पाउल घालुन वेतसबाला वळून्
हरित् उपान्ती स्वस्थ झोंपल्या हात परस्पर जुळून् ॥
कर्पूरस्पर्श-शीत त्यांच्या करकुंजांतुन झुकून्
चपल चंद्र वीचींतिल; तैसें व्हावें हें मनिं वरून् ॥

मुऱ्हें—धुकें.

पुष्पाशीं हितगुजें करोनी हृदयीं त्यांच्या शिरून्
परस्परांचे निरोप न्यावे हितगुज कांनीं करून् ॥
पुष्पांसव सिरपून सारखें मदिर, वृत्ति बावरून्
पराग उधळित पातळ पांखें मळवावीं फिरफिरून् ॥
तळपत राहुनि अविरत चंचल पुनरपि यावें जुळून ।
शिरपेचापरि पुष्पशिरांवरि स्थिर व्हावें आदरून् ॥
धवल धुई स्वप्नांची शीतळ हाय परी पाजळून्
चिताभस्म होउनी उधळलें काय अता तें जगून् ॥
पुष्पांचे कवडासे गेले वेलींवरुनी उडून्
आशेच्या डाहळीवरोनी दंव गेलें तें ढळून् ॥
पांख जळोनी फूलपांखरूं—कळीपरी कोमळून्
पोळत पडलों धुळींत देवा तृणजलुका मी बनून् ॥
आंसवसेकें पायतळींची धूळ तापली शिपून्
सरपटतांना शिणलों मृत्यो ! कां नच नेसी टिपून् ॥

मदिर—मत्त करणारें. सिरपून—शोषून. धुई—धुकें. पांख—पंख.

# यदृच्छेस

बाल्याचें नभ सावकाश रमुनी उल्लंघिलें स्वेच्छया
आतां या क्षितिजीं निवास मजला अत्यल्पसा नेमिला
बाल्याचे रमणीय प्रान्त इथुनी येतात लक्षावया
अज्ञातीं गढलें भविष्य न दिसे कांहींच त्याचें मला

वाटे भीति मना म्हणून उमटे ही तीव्र इच्छा मनीं
जावें कीं परतूनिया पुनरपी पाहाड ओलांडुनी
अन्यस्पर्शित पांखरापरि मला थारा तिथें कोठला
आशंका शिवतां मनास गमतें हो पोरकें पोरकें

नेत्रांनो ! नच चित्र तें वळुनिया आशादृशा पाहणें
अश्रूंनो ! उमटे तरी पुनरपी टाका पुसोनी बळें
टोंची अंतर हें कसाब सजलें बोले, " विसावा पुरे—
उद्दिष्टास तुझ्या उशीर तुजला होणें मुळीं ना बरें "

उद्दिष्टास ! परी मला न उमजे तें कोठलें कोणतें
यदृच्छे ! तुज ठाउकें जरि तरी पोंचीव तूंची तिथें

## बालमित्र

प्रातःकालिक जीं नवीन कुसुमें बागांत उल्हासती
प्रेमानें सरसें निरागस तदा त्यांचीं किती चालती
माळ्यानें खुडतां पुढें न कळतें जाती कुणाच्या करीं
काळानें नकळे कुठें दवडिलें तैं बालमित्रां दुरी ।।

बाल्याच्या प्रहरांत शैलशिखरीं अच्छोदकाचे सर
क्रीडा रम्य सवें मिळोनि करिती होवोनिया निर्भर
एकामागुन एक भिन्नगतिनें जातात ते पांगतां
तैसें दुर्लभ हाय दर्शन मला झालें गड्यांनो ! अतां ।।

सरसें–क्रीडा.

# मृत्यु कसा हवा ?

व्योमाच्या कुहरान्तरांत शिरण्या जैं द्वार तो चंद्रमा
तैसें जीवन मानवी मज गमे काळांत डोकावया
काळाच्या विनिगूढ गीत-ततिचा प्रारंभ हें जीवन
मृत्यूनें स्व-रयेंच जें सृजियलें तें पात्र हें जीवन

वाऱ्याच्या वहनें फुलोनि सुमनें येती नव्या यौवनीं
वाऱ्याच्या वहनेंच तीं गळुनिया जातात वेलींतुनी
देहींचें नवजीवतत्त्व सरतां कोमेजतां जीवन
काळाच्या लहरीसवें सहज हें जावो गळोनी सुम

काळाच्याच अखंड सूत्रवलयीं जीं जीवितें गुंफिलीं
हांसोनी क्षणमात्र अन्य घडिनें होणार कोमेजलीं
आहे जीवन हेंच जीवन तुझें, काळा ! न त्याची क्षिती
रोगानें मरणें नको मज गमे त्याचीच मोठी भिती

जैसा वृक्ष निशागर्मीं सहजसा होईल निष्कूजित
तैशी ही तनु शांत होउं सहसा त्यागोनिया जीवित
येतो चंद्र नभावरी उगवुनी दृष्टीस चोरुनिया
येवो मृत्यु तसा जिवा उजळण्या ही याचितों मी दया

## वात्सल्यातिशयें

वात्सल्यातिशयें जिनें तव शिरीं प्रेमासवें ढाळिलीं
घेतां पाडुनि आपुल्या पदिं तुला लज्जा नहीं वाटली
उन्मत्ता! कृतकार्य पूर्ण अगदीं झालास ना तूं अतां
मातेला नमवून उन्नत पदा जाणार तूं कोणत्या?

# नकोत खर दूषणें

नकोत खर दूषणें परुष भाषणें, प्रेमले !
तटातट तुटोन हें हृदय स्फुंदुनी मोकले ।
तुझीं करुण आंसवें हृदयसंपुटीं दाटलीं
मदन्तर भरोनि वाहतिल स्वेच्छ या लोचनीं ।।

सुराग वरुनी वरी तव सुभाषितें रंगलीं
सुधामधुर स्नेहस्यंदनिं सुमें बरीं सिंचिलीं ।
पराग अनुराग ज्यांत रमला सुखें तीं सुमें
प्रदग्ध पडलीं परी तपत मत्त दुर्भाषणें ।।

प्रमाद दृग्रंजनापरि मदीय त्वां गोपिले
प्रमुक्त प्रयतादृशें सकल प्रेम प्रक्षेपिलें ।
अशा सदय दृष्टिला परम ताप मी जाहलों
क्षमस्व, जननी ! क्षमा तव सुशील मी तापलों ।।

रजःकण असेन मी परम नीच नीचाधम
तरी मम निवास त्वद्हृदयपंकजीं उत्तम ।
असेल जर जिंकिलें परम रम्य तें उत्पल
जगांत उरली कुठें अमल श्री, सये ! वत्सल ? ।।

# विश्वकर्म्याची मोट

सागराची बाव । पहाडाची धांव
थोराड वडव । सुळक्यांच

सूर्याचे अभंग । माचाडाला चाक
मुळी कुचकूच । करीना तें

दिवसाचा शुभ्र । नाडा चाकी फिर
रात्रीचा सौंदर । मळीण त्यो

मोटकरी मौजा । रगडुनी गाई
घुमविली राई । भोतालची

वाऱ्याचे चपळ । बैल भीमबळ
परी चळचळ । कांपताती

विजेचा आसूड । मारी फडाफड
बैल जीवापाड । ओढ घेती

धांव—मोट ओढण्यासाठीं बैलांकरितां केलेला उतार. वडव, माचाड—चाक बसविण्याकरितां उभीं केलेलीं लांकडें व त्यांची चौकट. नाडा—मोटेचा वरचा दोर. सौंदर—मोटेच्या सोंडेचा खालचा दोर.

ओढताती बैल । झराझर आल
जळाचे मोहळ । निथळत

लाखों पखालींची । मेघांची वो मोट
क्षितिजाची वाट । चढो येते

धो धो घुमराई । झाली एक घाई
मोट रिती होई । कोसळतां

खोऱ्याच थारोळ । जळें उचंबळ
नद्यांचे वहाळ । खळाळतां

सृष्टीच्या शेतांत । वावरांचे वाफे
वाहले आपाप । भिजोनिया

## मध्यरात्र

धूसर भुरक्या स्थिर मेघांच्या
चिता चहुंकडे कोळपलेल्या
कचिदेकादी शशितेजातुर
उजळ दिसे जळतांना क्षणभर
भेसुर करितें अधिकाचि अंबर
स्मशान. तेथें पाहवे न वर ॥

प्रतिबिंबचि कीं वरचें खालीं
थेट धरेच्या उतरे भाळीं
मध्यरातिच्या भयाण काळीं
सामसूम दिसते झालेली
घर-घरवंदें थडगीं सजलीं
जितीं माणसें ज्यांत गाडलीं
खरोखरीचीं श्वानें धावुनि
धरा जराशी दिसे हदरली
पुन्हा पसरली स्मशानशांती ॥

# गोटा घोटिव॰

[ 'दोन शिष्य' या कवितेच्या कर्त्यास व विशेषतः त्याच्या प्रचोदक सद्गुरूस समर्पण. ]

गोटा घोटिव तैलयुक्त तळपे मानेवरी वळ्कटथा
बाहेरी फुटले जणो पुरण तैं त्या गालवाटया निक्या
आहे मूठभरीच भाळ, जबडा त्या लठ्ठ मोटेपरी
राजाचा उलटा मुगूटच दिसे याचा मुखश्चंद्रमा !

द्वेषाची धुमसे सदा धगधगे चित्तांत याच्या चिता
गालांचा फुगवून भासत जणूं भाता तिला चेतवी
धांपा टाकित तोंड वाशि महिषीनाथापरी देविच्या
कष्टें व्यासपिठावरी बरळतो हा लठ्ठ मोठया वचा

पूर्वी वाहन शारदेस रुचलें ज्ञानेश ज्ञानेश्वर
त्या मोरावर बैसुनि त्रिजगतीं ती नाचली निर्भर
पाठीं बांधुनिया वळेंच तिजला हेला डुले सांप्रत
केकाऐवजि देत देत मधुनी रेंका मनोहारक !

कोणी या सहसा पुसे नच म्हणे द्या हो अभिप्राय कीं
कीं द्यावी लिहुनी बुकास मम या प्रस्तावना थोडकी

देविच्या—देवीस काढलेल्या बळीप्रमाणें.

दुर्दैवें फसतां कुणी नव कवी घे सूड सव्याजही
ग्रंथा पांच परंतु पंचविस हा प्रस्तावपानें लिही
बापाचा समजून माल शिणवी हा लेखणीला झणीं
प्रेसाचीं भरतां बिलें विवळतो वेडावलेला कवी

उष्टीं घेउनिया पुराण वचनें तीं तीं सदा हा कुटी
त्याचें चालत पिष्टपेषण सदा हा शब्दघोटया अती
ऐशाच्या 'कथितांत' 'कथ्य' लवही कैसें बरें सांपडे
झालें सर्व 'कलांग' भंगुनि जरी याचें लुलें बापडें

जाडे शब्द घशांत आडकुनि हा सुस्तावुनी उच्छ्वसे
तेव्हां बेडुक खाउनी पहुडल्या सर्पापरी हा दिसे
'सोम्यानें सडकून सोडविन मी त्या शब्दभेका कधीं'
हाची एक विचार श्रोतृहृदयीं थैमान घाली तधीं

विद्वांना विनवून चार लिखितें त्यांची जमा हा करी
छापोनी वर ग्रंथकार मिरवी प्रोफेसरी ती खरी!
प्रूफें वाचुनिया सरासर सदा देतो किती सत्वर
ठावें कां न जना म्हणोन म्हणती हा एक प्रोफेश्वर

# हिंदुदुर्गाचा पोवाडा

( चालः---दख्खनचा दिवा० )

हिंदुदुर्ग हा गड बडा असे खुपलढा
वर धगागतो हा भगवंताचा झेंडा
परि आज येउनी दाट घातला वेढा
परधर्म मिळोनी झाला एकचि रगडा ॥ धृ० ॥

यवनांनि बांधला चंग हिंदुदुर्गास
जमविल्या रानदांडग्या जमाती खास
दलबादल अणिली सेना या समयास
दिले मोर्चे नेमुन अपापल्या लोकांस
केलि मसलत त्यांनीं इंग्रज भादूरास
लाविलें लगामीं अपुल्या त्यांनीं त्यास
पर कौसल त्याचें कसें कळेल बैलास
चाल—इंग्रज मनीं हांसला ।
म्हणे " खुशाल चढुं द्या याला ।
हा उद्यांच कढुनी मेला ।
कांटाच एक उपटला ।
हिंदूच तवढा मग उरला ।
मी पाहुन घेइन त्याला । "

धरुनिया असें मनिं कपट । बोलतो निपट ।
"वेळ कां फुकट । असा तुम्ही दवडा" ।। हिंदु० ।।

२

नावाचे धारकरि भले आले समरास
शिया सुनी अल्ला अणि मुल्ला आले गणतीस
दांडग्या भांडग्या मस्त मुसल्मानास
झाला हुकुम " तुम्ही रे पेंढारि लुटा मुलुखास
म्हणुं नका रे कोणी मायमावशि समयास
बाटवा बायका लुटा त्यांचि धनरास
देवदेवळांचा करावा बेशक नाश
गायांची कंदुरी करा विका गोमांस
एरवीं न येतो हिंदुदुर्ग हारीस "
चाल—असें बोलुन पेंढाऱ्यांस
झाला निरोप बदमाशांस
मग तयार झाले हल्ल्यास
बिनि दिली खोजा हसनास
दुमदारि दिली निजामास
त्या हैदराबादच्या मोगलास
कंबरका अल्लिबंधूंस
धरुनीया बळकट नेट । उठविला वेठ ।
भिडविला थेट । थेट जाभाडा ।। हिंदु० ।।

३

गुल झालि मिळाले किल्ल्यांत वीर समस्त
तो नागपूरचा मुंजापा रणमस्त
शत्रुला कऱ्हाची घालुन बसला धास्त
करि जिवापाड जातीनें मेहनत कस्त
शर्तिनें शत्रुच्या दळांत घाली घस्त
मारून आणतो हर दिवशीं नवि रस्त
चाल—मालवीय पंचीप्यारा
कुल् फौजामाधिं अस्कारा
ज्याचा त्रिखंड गाजे दरारा
तसा सावरकर तो जवादा
त्याची शर्यत सबसे जादा
चित्राव चित्यापरी उमदा
असे जमले वैद्यासुद्धां
वीरश्रि धरुनि चित्तांत । सुरइ हातांत ।
मारिती हात । रगडिला वेढा ॥ हिंदुदुर्ग० ॥

४

तरसली मोंगली सेना झालि वित्रास
हल्ल्याने किल्ला खामखा नये हातास
म्हणुनिया काढलें नव्याच हो मसलतिस
फितविले आंतल्या फितुरी जमातदारांस

लिहुनिया लखोटा आंत लाविला त्यास
" किल्ल्याची किल्लेदारि देइन मी तुम्हांस
बेलभाक घ्यावी, द्यावि तुम्ही आम्हांस
चाल—माहार आणि मातंग
किल्ल्यासी बुरुज बुलंद
भिडवियले त्यांना सुरुंग
देतां बत्ति पावतिल भंग
मग वाटा रुंदच रुंद !
घालुन घेऊं तटावर समद
(ते वेळीं) तुम्ही आंतुन करावी धुंद "
संकेत, जाहला बेत। मोंगलाईंत।
उद्या करु धाडा ॥ हिंदु० ॥

५

पर इकडे ऐका आंत झालिसे मात
सकटानें पुरी घेतली होती पाळत
फितुरीचा कागद मध्येंच केला दस्त
दिला नेउन किल्लेदाराच्या हातांत
*चाल—मग झाली एकच घाई
त्यान मिळविले कुल भाई
" जाहली गोष्ट निरुपाई
फितुरानें पेटली बाही

दादानु न्याय द्या कांहीं "
केलें सर्व्यां एका ठायीं
फितुऱ्यांची मारली डोई
घेतली करांमधीं सुरई
रातचेच पडले बाही
वाजे नौबत जाही जाही
केला पराक्रम उद्भट । घेतली पाठ, घातली गांठ ।
त्यांच्या गोटांत । केला त्यांचा चुथडा ॥ हिंदु० ॥

६

हिंदुनीं मारिली हल्ला झालें जाहीर
शाहीर रची पोवाडा आलि त्या लहर
यशवंत रची अक्षर-हिऱ्याचा हार
पाडून पैलु गोविंद गुणी गाणार
चाल—समजला हिंदु तेवढा । पडुं न द्या लढा ।
तेढही सोडा । भागवत जोडा ॥ हिंदुदुर्ग० ॥

सध्यांच्या काळीं 'पोवाडा' म्हणून करावयाचा झाला तर त्याची रचना व स्वरूप सर्वस्वीं जुन्या पद्धतीचींच असलीं पाहिजेत. मग विषय कोणचाहि असो. प्रस्तुतच्या रूपकांत तोच प्रयत्न केला आहे.

# चिलिया

[ राग भैरव. चाल--मानुंगा न हरगीज० ]

माय न मज बहा लाज न माया
चिरिला मी बाळ चिलया ॥ धृ० ॥
ज्या मुखाच्या मृदुल देठा
ओठ झटले चुंबनाला ॥
बाळकाच्यावाणि कवळा
तो गळा मीं छेदियेला ॥
घालुनीया अंकिं तान्हा
पदरिं पान्हा पाजियेला ॥
पाजुनीया निजवुनीया
मारियेला फसवुनीया ॥ चिरिला मी० ॥

# तूं खराच, काळा! काळा

तूं खराच, काळा! काळा। ना दया तुला ना माया
ना विचार सारासार। लव विवेकबुद्धी व्हाया
अति निर्दय निष्ठुर फार। रडविलें किती लोकां या
वनिं खेळत क्रीडत असतां।
कोंकरास उचलुन नेतां।
गरुडापरि वरच्या वरता।
त्या तुला वदावें काय। नांव काय द्यावें हाय!।

२

कमलपत्रपर्यंकीं जो। स्थित अशा मनोहर हंसा
शरप्रहार करुनी त्याची। ज्यापरी करावी हिंसा
त्यापरी मारुनी याला। कां पळशी नीचा ऐसा
नेतोस जरी एकाला।
रडविशी इतर सकलांला।
कल्पना काय ती तुजला।
नयनाश्रू टपटप पडती। सर्व धायि धायी रडती।।

३

पितरांच्या वेलीवरची। ही मुग्ध मनोहर कलिका
नख लावोनी कां खुडिली। ती विकास पावत असतां?
यौवनाचिया म्यानांत। लपलेलि गुणयुतासिलता

काळाच्या गंजानें ती ।
गंजिलीस कां रे हातीं ।
कां सहन होत ती नव्हती ।
तें तिचें घालवुनि पाणी । आणिलें लोचना पाणी ॥

४

नभसौधिं सुधाकर येतां । हा धवलयशोयुत नेता
या कुमुद कमलिनी फुलतां । जणु मोदभरानें हसतां
हें विश्व गोड गुंगींत । आनंदानंदें डुलतां
हा कृतान्त राहू आला ।
पकडुनी सुधाकर धरिला ।
पीयूष शोषुनी गेला ।
निगतासू झाला गेला । कमलिनी लपवि स्वमुखाला ॥

## —ना

विशाळ विस्तृत कपाळ शोभे भव्य पठारापरी
बुद्धिची तपःशिला कां तरी ? ।।

धुकें चिकटलें कडेपठारीं तेविं विराजे शिरीं
शुभ्र ही तुरळ केशपिंजरी ।।

सिंहापरि तेजाळ तेवती डोळे दिपविति किती
तळपते तडित् तडागांत कीं ?

सेतूपरि ही सरळ दीर्घ नासिका शोभते अती
तुलयची विशाळ भाळास ती ।।

वा तपाळ कपाळ सहाण आयत खरी ।
नासिका टेकली चंदनखोडापरी ।
पाणिदार डोळे पूरित अर्घ्यांपरी ।

बुद्धिचंदनें देश-देव चर्चिला सारखा तुम्ही
परिमळें प्रसन्न जनही अम्ही ।।

## बालगंधर्वास

[ मंदाक्रांता ]

बोला बोला विमल उमले स्निग्धदंतावली ती
वाटे मुक्ता भरुनि भरुनी अंजली, ओष्ठ देती
संगीताच्या मृदुल लहरी मुक्त त्या नाचता जी
ताजी ताजी उमलुनि वरी येत ही फेनराजी ॥

कीं हास्याचें विमल अगदीं हास्य ही दंतपंक्ती
कीं कंजाच्या मधुरमुखिं ही दाटली बिंदुपंक्ती
दुग्धस्निग्धा प्रणयस्मरणी पुंडरीकप्रियेची
मुक्तामाला तुज गवसली, राजहंसा ! तियेची ? ॥

# संतत जाणीव

अद्वितीयशा पुरुषापोटीं जन्म देउनी मला
कशास, देवा! मला राखुनी कलंक त्या लाविला? ॥
विद्वत्तेनें, कर्तृत्वानें, स्वयंस्फूर्तिनें तसा
शून्य राहिलों पूताग्नींतिल धूमस्तोमचि जसा ॥
पुण्यस्पर्शोत्संगीं त्याच्या एकवार बसवुनी
अपरक्षणिं कां मला न दिधलें चितेंत रे लोटुनी? ॥
नच गुणवत्ता, नच विद्वत्ता, कशास मग हें जिणें
त्या पुरुषाच्या शुभ्र यशाला काजळ हें फांसणें ॥
दुर्गुण नसले तरी फुकट ही निर्गुणता वाउगी
जलदापासुनि जल वर्षे तरि भूषण उभयांस कीं ॥
प्रकाशपुंजापासुनि जन्मे छाया आम्ही तसे
प्रकाशकिरणीं त्याच्या अमुची छाया पसरत असे ॥
सामान्यांतुनि असामान्य ते धन्य कृती जाहले
असामान्यतेंतुनी कधीं कां असामान्य जन्मले?
स्वातीच्या जलसेकासिंचनें शिंपल्यांत मौक्तिक
परी मौक्तिकापासुनि मोती कधीं न हें ठाउक!! ॥

# तेंच गडे गाईं गाणें

तेंच गडे गाईं गाणें
　　का लाविशि इतर बहाणे
मुख मुरडुनि कोडिसवाणें
　　लाजशी अशी कां ? ॥

२

आधींच तयाच्या स्मरणें
　　स्फुरण ये जणों तव वीणे
गुणगुणे किती अनुरणनें
　　एकतान व्हाया ॥

३

कींव करी लावी सूर
　　हुरहुरतो माझा ऊर
वाहवी कृपेनें पूर
　　सूरसंपदेचा ॥

०

कोडिसवाणें—देखणें, सुंदर.

# जाळावया पोट

जाळावया पोट कांटे भरोनी स्वयें शृंखला घेतली घालुनी
मी तो न आतां सखा एकलाणी तुझा, बापुड्या दूर हो
सोडुनी

२

घालोनि कंठीं मिठी मान मानेवरी टाकुनी पाडसाच्या परी
निःशंक त्या बालका मोकलावें करोनी तया दास जन्मावरी

३

कोळ्या कळ्यांचा जणो गुच्छ तूझी मिठी मोकळीशी
कराया जसा
चोरापरी हात हाळूच मी वोढतों तों तुला जाग ये राजसा

४

संतप्तचिंतातपें दग्ध भूमी कसें संभवे आपुलें गोकुळ ?
आलाप तें मोहरी मोकलूनी जडा त्यागुनी चिन्मयीं संकुल

५

निर्द्वंद्व स्वच्छंद सौख्याचिया त्या उदारांबरीं मेघखंडापरी
रे वोळलो संथ विस्तीर्णपर्णापरी भव्य कासारपृष्ठावरी

मोहरी—बांसरी.

६

शून्याकृती मात्र माझी तुझी रंगरूपावळी चेतनाही गती
स्नेहार्द्रता, मंद गंभीर वा घोर ती घोषणा रे तुझी रे तुझी

७

मातेचिया मान्य अंकीं तिच्या पालवाच्या सुखें स्निग्ध छायातळीं
मी झोंपलों फुल्ल व्हाया जशी पल्लवीं मूक मुग्धा फुलाची कळी

८

पांहाटच्या मंदमंदानिलाच्या तरंगांपरी भेटुनिया मला
या यौवनीं वाहिलें जाहलासी सखा सोबती तूंच रे एकला

९

जे हात आळी कराया गळ्याभोंवतालीं तुझ्या वोढ-वावे पुढें
बांधोनिया फास त्यांचाच घाटी चिरी चोरटें पोट हें वांकडें

८५२८

## उन्हाळ्यांतला पिंपळ

सळसळ वाहे वारा भंवतीं
पिंपळशाखा कुजबुज करिती
हिरव्या गुंफा डोलुनि जाती
फडफडुनी क्षण शांत राहती
तानतरंगांतुनी समेला शिवतो गायक जसा पुनःपुन

२

कडक उन्हाचा सागर भंवता
महाल हिरवा त्यावर तरता
स्थाणूनें नांगरला पुरता
डळमळतों तो अरतापरता
अचपळ पक्षी सूर मारुनी पटपट येती जाती त्यांतुनि

३

प्रखर उन्हाचा रखरखीत वा
वाळवंट वैराण पसरला
आकाशींच्या मुशाफराला
अरबी ओयासिस सांपडला
विशाल विस्तारांत तयाच्या लपले असतिल कितीक पक्षी

४

यानांच्या या गर्द टेकड्या
व्याप घालुनी प्रचंड बसल्या
भस्मी शाखा–पाउलवाटा
मधुनी वरवर दिसती चढतां
त्या वाटेनें प्रवास करणें भाग्य कोठलें इतुकें अमुचें ?

## दोल्यावरी बसोनी। जीं गाइलींस गाणीं

[ चालः--प्राणासमान प्यारी. ]

दोल्यावरी बसोनी। जीं गाइलींस गाणीं
दोल्यासवें अजोनी। हेलावतात कानीं
निःशब्द शांत सरसीं। मृदुमंद वात हलुनी
नवलोल वीचिलेखा। उठती जशा उलोनी
तैशा लकेर-लाटा। येतात मंद वहनीं
हलवूनि हृत्तटाका। हरतात भान अजुनी ॥ १ ॥
अभिषेक मंगलाचा।–आसार ओसरोनी
स्वन शांत होत वाटे। गेलें विरोन व्योमीं,
गिरिकंदरीं परी त्या। उठतात स्रोतसरणी
त्या दिव्य गायनाच्या। तानाच घेत फिरुनी
चुकल्या तुझ्या लकेऱ्या। हृदयांत या झरोनी
हलवूनिया दिलाला। हरतात भान अजुनी ॥ २ ॥

आसार–जोराची वृष्टि.

# शुद्धि

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ११ | शातीच्या | शांतीच्या |
| ४२ | नेत्रात | नेत्रांत |
| ५३ | सिताचला | सितांचला |
| ५९ | भरला | भराला |
| ६० | अभ्रैं | अभ्रें |
| ६१ | थाबसी | थांबसी |
| ७२ | साम्य | सौम्य |
| ८० | लज्ञा नहीं | लज्जा न कां |

REFBK-0004727

REFBK-0004727

8424